शब्द–ब्रह्म
E ISSN 2320 – 0871
भारतीय भाषाओं की अंतर्राष्ट्रीय मासिक शोध पत्रिका 17 जून 2021
पीअर रीव्यूड रेफ्रीड रिसर्च जर्नल

# संस्कृत नाट्य परंपरेतील आद्य नाटककार भास का 'अश्वघोष' : एक अध्ययन

संशोधक : प्रा. राहुल राम हळदे
मार्गदर्शक, : प्रा. डॉ.संजय पाटील देवळाणकर
सौ.के.एस.के. महविद्यालय
बिड, महाराष्ट्र, भारत

## शोध संक्षेप

*भारतीय नाट्यजगतात दोन प्रमुख नाटककारांचा प्रामुख्याने समावेश केलेला आढळतोण्ज्यामध्ये नाटककार भास आणि अश्वघोष यांचा समावेश आहे। अश्वघोष यांचा लिखाणात बुद्ध प्रसिद्धीची व बौध्द धर्माची छाया प्रचंड दिसते। तर भासांची लेखणी चौफेर विषयावर असल्याचे जाणवते। परंतु आज अनेक विचारवंतामध्ये या दोन महान नाटककारापैकीआद्य नाटककार कौन ? असा प्रश्न सतत उपस्थित होतो। हा प्रश्न कालगणना ह्यावरून सहज सुटल्या जावू शकतो। म्हणून खालील विश्लेषण यामधून वरील विषयाच्या जवळपास जाण्याचा पर्यंत केलेला आहे।*

## प्रस्तावना

नाटककार भास व बोधिसत्व अश्वघोष हे संस्कृत नाट्य जगतातील आद्य नाटककार मानले जातात। अश्वघोष यांनी बौद्ध धम्माच्या प्रचार व प्रसारार्थ काही रचना लिहिल्या, त्यामध्ये प्रामुख्याने बुद्धचरित, सौंदरनंद आणि शारीपुत्र प्रकरण हे तीन नाट्यकृती आहेत सौंदरनंद या नाटकाच्या शेवटी त्यांनी स्वतः विषयी एकदम थोडी माहिती दिलेली आहे।

आर्यसुवर्णाक्षीपुत्रस्य साकेतवासिन: भिक्षोराचार्य।
भदन्ताश्वघोषस्य महाकवेर्महावाग्मिन:
कृतिरियम्।।[1]

सुवर्णाक्षी ही त्यांची माता असल्याचे त्यांनी नमूद केले असून तो साकेत अर्थात आजच्या आधुनिक अयोध्या नगरी चा तो रहिवासी होता। याशिवाय आजच्या आंध्रप्रदेश राज्यातील जगय्यापेटा येथील शिलालेखावरून आचार्य नागार्जुन हे भदंत अश्वघोष यांचे शिष्य होते। असा उल्लेख मिळतो शिवाय ते सम्राट कनिष्काने आयोजित केलेल्या काश्मिर येथील चतुर्थ बौद्ध संगतीचे उपाध्यक्ष सुद्धा होते, असा उल्लेख आपणाला मिळतो। त्यांची नाट्यरचना अत्यंत प्रभावी व मानवी जीवनाचा सखोल अभ्यास करणारी होती।

महाकवी भास हे संस्कृत नाट्य जगतातील अत्यंत महत्वाचे नाटककार आहेत नाट्यलेखन, दिग्दर्शन व रंगततत्त्वाची पकड असणारे ते महान विद्रोही असे नाटकार होते। त्यांच्या एकूण 13 नाटकाच्या प्रति केरळ प्रांतात मिळाल्या, नाटककार भासांनी रामायण महाभारत, कृष्णकथा व लोककथेवर आधारित नाट्यरचना केली। भासांची नाट्यरचना तत्कालीन रंगकर्मी व आजच्या आधुनिक रंगकर्मींना सुद्धा प्रेरणा देणारी आहे। त्यामुळे कालिदास, शूद्रक, बाणभट्ट, राजशेखर, श्रीहर्ष सारखे व्यक्ती सुद्धा त्यांच्या लेखनापासून प्रभावित झालेले आहेतए यात वाद नाहीण्नाटककार भास व भदंत अश्वघोष यांची

प्रेरणा कालिदास सारखा जगविख्यात नाटककार घेतो, म्हणून एक प्रश्न सहज उभा होतो की नाटककार भास हे अश्वघोषाच्या परवर्ती होते की, अश्वघोष हेभास यांच्या परवर्ती नाटककार म्हणून होते। याचे संशोधन अध्ययन होणे महत्त्वाचे ठरते। म्हणून या दोन्ही महान नाटककारांचा कालखंड निश्चित करणे महत्वाचे ठरते।

### अश्वघोष यांचा कालखंड

संस्कृत साहित्या मध्ये काव्यकार किंवा नाटककार यांची जन्मतिथी निर्धारित करणे ही मोठी क्लिष्ट अशी बाब आहे। या महान विद्वानांनी कुठेही जास्त आत्मप्रकाशन केलेले नाही। बौद्ध कवी अश्वघोष यांचे बाबत सुद्धा विद्वानांमध्ये मत-मतांतर असल्याचे दिसून येते। असे असले तरी प्राचीन बौद्ध साहित्यात असलेल्या उल्लेखावरून आपणास या महान नाटककारा विषयी किंवा त्यांच्या कालखंडा विषयी माहिती मिळते। प्रा. सिल्वालेवी यांनी जनरल अस्थैटिक सोसायटी मध्ये प्रकाशित जुन्या चीनी लेखावरून त्यांना सम्राट कनिष्क यांच्या समकालीन मांडलेले आहे। याशिवाय थॉमस या विद्वानाने कनिष्काने साकेत यावर आक्रमण करून भगवान बुद्धांचे भिक्षापात्र व भदंत अश्वघोष यांना आपल्या सोबत घेतले असा शोध लावलेला आहे। यासोबतच अनेक विचारवंत व विद्वान इतिहासाच्या पुराव्यावरून त्यांना कनिष्काने आयोजित केलेल्या चतुर्थ बौद्ध संगीति चे उपाध्यक्ष व वसुमित्र अध्यक्ष असल्याचे मांडलेले आहे। त्यासाठी त्यांनी चीनीयात्री इत्सिंग व होऊन सांग यांचे संदर्भ घेतलेले आहेत काही आंतरिक व बाह्य पुराव्यावरून असे सांगता येईल की महाकवी अश्वघोष यांच्या बुद्धचरित या नाटकाचा अनुवाद इसवीसन पाचशे मध्ये चिनी भाषेत झालेला होता याविषयी याशिवाय बुद्धचरित नाटकाचा अंतिम सर्ग सम्राट अशोक यांच्या यांनी आयोजित केलेल्या तृतीय बोध संगतीची विषयी वर्णन मिळते तसेच अश्वघोष हे निसंदेह कालिदास यांचे पूर्व ती आहेत त्यामुळे अश्वघोषाच्या कालखंड हा कनिष्क सम्राटाचा कालखंडाचा समानांतर आहे अर्थात इसवी सनाच्या प्रथम शतकात त्यांचा कालखंड म्हणावा लागेल।

चिनीयात्री इत्सिंग व ह्युयासंग यांचे संदर्भ घेवून काही आंतरिक व बाह्य पुराव्यावरून असे सांगता येईल की महाकवी अश्वघोष यांच्या बुद्धचरित या नाटकाचा अनुवाद इसवीसन पाचशे मध्ये चिनी भाषेत झालेला होता। याशिवाय बुद्धचरित नाटकाचा अंतिम सर्ग मध्ये सम्राट अशोक यांनी आयोजित केलेल्या तृतीय बुद्धसंगती विषयी वर्णन मिळते। तसेच अश्वघोष हे निसंदेह कालिदास यांचे पूर्ववती आहेत कारण कालिदास त्यांना आदरातिथ्य मानतातए त्यामुळे अश्वघोषाच्या कालखंड हा कनिष्क सम्राटाचा कालखंडाचा समानांतर म्हणजेच इसवी सनाच्या प्रथम शतकात त्यांचा कालखंड मानावा लागेल।

शिवाय जगय्यापेटा येथील शिलालेखावरून अश्वघोष हे नागार्जुना ह्यांचे गुरु होते असा उल्लेख मिळतो। यावरून सहजच बोध घेतल्या जावू शकतो की, नागर्जुना यांचा कालखंड हा ई.सन १०० मधील आहे त्यामुळे आचार्य अश्वघोष हे इसवी सणाच्या पहिल्याच शतकात होते हे निर्विवाद सत्य आहे।

### भासांचा कालखंड

भासांचा कालखंड ठरवणे हा काहीसा क्लींष्ट भाग आहे, अजूनही संशोधनास पात्र असलेला हा विषय प्रामुख्याने आढळतो। अजूनही काही नाट्यकलावंत, विचारवंत एव साहित्यकार भासांच्या कालनिर्णयावर एक मत होऊ शकले नाही। जास्तीत जास्त संस्कृत लेखकांच्या

प्रमाणेच यांचा कालखंड सुध्दा अंदाजाने ठरवावा लागेलएपरंतु काही बाबी या भासांच्या कालखंडा च्या जवळपास नेणारे आहे।

शास्त्रीय दृष्टिकोनातून विचार करताना त्यांच्या अंतर्गत घटक व बाहय घटकाचा अश्या दोन बाबींचा संगोपान अभ्यास करावा लागेल। कालिदास, बाणभट्ट, राजशेखर यांनी केलेल्या भासांवरच्या विवेचनावरून व निर्देशांवरून त्यांना ई.सन 700 च्या पुढे नेणे संभव दिसत नाही। त्या शिवाय दुसऱ्या बाजूने भासांच्या नाटकाचे विषय, दंतकथा, लोकजीवन, पुराण, आख्यायिका हा सगळा भासांच्या नाटकाचा विषय, हे कित्येक दशके अर्थातच ईस्वी पूर्व कालखंडातील निर्देश करतातण्म्हणूनच यांना दोन घटकात विभागणी करून अभ्यास करणे महत्वाचे ठरते।

काही तज्ञाचा मतानुसार सर्वात प्राचिन उपलब्ध असे नाटक हे शुद्रकाचे 'मृच्छकटिकम' मानले जात होते, परंतु 'चारुदत्त' हे नाटक भेटल्यावर 'मृच्छकटिकम' हे त्याचे अनुकरण असल्याचे दिसते। त्यामुळे शूद्रक हा भासांच्या नंतरचा आहे हे सिध्द होते। विनसेट स्मिथ यांनी शुद्रकाचा कालखंड हा ईसा पूर्व 200 मानला आहे, ह्यावरून चारुदत्त हि रचना त्याही पूर्वीची असावी असा तर्क आहे।

डॉ. ए.पी. बनर्जी ने भासांचा काळखंड हा ईसा पूर्व 200 ठेवला आहे। कारण :

(क) भासानी वात्सायन व त्यांचा कामशास्त्राचा उल्लेख केला नाही।

(ख) पाणिनी एकात्यायन व पतंजली हे भासांच्या नंतरचे आहेत असे ते मानतात।

(ग) मनू चा कार्यकाळ ईसा 200 आहे त्यातील मानव धर्म शास्त्र ह्याचा उल्लेख भासानी केलेला आहे, ह्यावरून ते भासांना ईसा ईसा पूर्व 200 चे मानतात।

गणपती शास्त्री हे भासाचा काळखंड हा बुध्द कालखंडाचा पूर्वी मानतात, म्हणजेच ईसा पूर्व 600 च्या हि अगोदर चा कालखंड ते मानतात। कारण पाणिनी हे ईसा पूर्व 700 मध्ये झाले व भासानी अ पाणिनीय भाषेचा वापर केला असे त्यांचे म्हणणे आहे।

भारतीय विद्वान डी.वी. केतकर यांनी ज्योतिष्य विज्ञान यांच्या गणिती शास्त्रानुसार कालिदास यांचा कालखंड हा ईसा ते 300 चा ठरवल्या जातो म्हणून भास यांचा कालखंड ते ईसा 100 ठरवतात ।

प्रा. देवधर हे त्यांच्या निबंध 'plays Described to Bhasa' या मध्ये भासाना ते अतिप्राचीन मानत नाही।

प्रा.ए.एस.पी. अय्यर ह्यांनी भासाला मौर्यकालीन मानतात।

डॉ. पुसाळकर यांनी त्यांचा रचनेच्या आधारावर कालनिर्धारण केले।

अ) प्रतिज्ञायोंगधारायण, स्वप्नवासवदत्ता, अविमारक या नाटकात उल्लेखलेली, प्राचिन राज्य मौर्याकाळापुर्वी म्हणजेच ईसा पूर्व 384 च्या हि पूर्वी वर्तमानात होते। त्यानंतर मौर्य साम्राजात ते विलीन झाले।

आ) स्वप्नवासवदत्ता मधील उज्जैयीनी नगरीचे राजा प्रद्योत हे कौशंबी चे राजा उदयन तसेच मगध साम्राजाचे राजा दर्शक यांचा उल्लेख व त्यांचा कार्यकाळ हे ईसा पूर्व 600 च्या पूर्वी च्या नंतरचा आहे, ते ह्याच कालखंडातील आहेत असे दिसते।

इ) जैन व बौध्द धर्माचा परिहास करतानाचे चित्र आपणास भासांचा नाटकात काही प्रमाणात पहावयास मिळते, त्यामुळे भास हा दोन्ही धर्माच्या आरंभाच्या जवळ पास असावा असे दिसते।

ई) भासांच्या काळात संस्कृती हि संस्कृत बोली भाषेवर आधारित होती संवाद युक्ती, संवाद, लिखाण हे लघु, सोपे व आलेखानुरूप चांगले असे होते। यावरून असे दिसते किए भास हे पाणिनीच्या नंतर झाले जेंव्हा व्याकरण विषय समाजात चांगल्याने रुजला होता, असा समज आहे।

उ) अविमारक मध्ये आढळलेल्या जादूचा उल्लेख किंवा काळ्या जादूचा उल्लेख हा कौटिल्याच्या अर्थशास्त्रात पण मिळतो, त्यामुळे डॉ.पुसाळकर यांचा मते भास हा कौटिल्याच्या पुर्ववती आहे।

ऊ) डॉ.पुसाळकर यांचा मते कौटिल्य ते ईसा पूर्व 400 मध्ये झालेत, त्यानी भासांचा श्लोक आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथात नमूद केला म्हणून ते भासाना मौर्यकाळातील कालखंडात ठेवतात।

ऋ) डॉ.पुसाळकर यांचा मते मनू स्मृतीचा उल्लेख भासानी आपल्या नाटकात केला नाही, तर त्यांनी मनू च्या पाहिलेच्या मानवीय धर्मशास्त्राचा उल्लेख केला आहे, म्हणून भास हे मनू च्या अगोदर होऊन गेले असे दिसते।

काही विद्वानांच्या मते खालील वेगवेगळा कालखंड भासांच्या बाबतीत ठरवल्या जातो ते येणे प्रमाणे

| | |
|---|---|
| 1) प्रा.रेड्डी | ईस्वी सन 1100 |
| 2) प्रा.काणे | ईस्वी सन 900 |
| 3) प्रा.देवधर | ईस्वी सन 700 |
| 4) प्रा.कीथ | ईस्वी सन 300 |
| 5) प्रा.केतकर | ईस्वी सन 200 |
| 6) डॉ.पुसाळकर | ईस्वी सन 500 ते 400 दरम्यान |
| 7) गणपती शास्त्री | ईस्वी सन 700 ते 600 दरम्यान |

खंडन-मंडन

**1) खंडन**

अ) प्रा.कीथ यांनी भासांचा कालखंड हा ईसा पूर्व 300 मध्ये मानला, ते म्हणतात भास हा अश्वघोषाच्या नंतर झाला। जर भास हा अश्वघोषाच्या नंतर झाला असता तर बुध्द चरित्र या नाटकात उपलब्ध एक श्लोक जो भासांच्या नाटकामध्ये मिळतो तो या प्रकारे :

काष्ठं हि मन्यज लभते हुताशं
भूमि खनन् विन्द्ति चापितोयम्।
निर्बन्धिन: किचन नाट्यसाध्यं
न्यायेन युक्त च कृतच सर्वमा।[2]

भासांचे प्रतिज्ञायोगन्धारायण नाटकातील श्लोक
काष्ठादग्रिर्जायते मध्यमानाद्
भूमिस्तोयं खन्यमाना ददाति।
सोत्साहाना नास्त्यसाध्यं नराणा
मार्गारब्धा सर्वयत्ना: फलन्ति।।[3]

ह्या दोन्ही श्लोकात विलक्षण साम्यता व दोघांचा अर्थ देखील सारखाच प्रतीत होतो भासांचे एकूण सामाजिक व राजाच्या कालखंडातील वैशिष्ठे हि ईसापूर्वकालीन दिसतात व विचारवंताच्या मते अश्वघोष हे इसनाच्या पहिल्या शतकाच्या सुमारास होऊन गेलेत। अश्वघोष हे एक बौद्ध धर्मातील हीनयान या संप्रदायातील एक बौद्ध भिक्षु होते शिवाय ते काश्मिर मध्ये झालेल्या बौद्ध संगोष्टी चे उपाध्यक्ष पण राहिलेले आहे। यावरून आपणास अश्वघोष यांचा कालखंड निश्चित करण्यास सहज मदत होते। अश्या बाबी वरून भास हा अश्वघोष यानंतर होऊन गेले असे मान्य करणे हे ग्राह्य धरता येण्या सारखे नाही।

अ) प्रा.कीथ पुढे म्हणतात की भासानी वापरलेली भाषा हि अश्वघोषाच्या नंतरची प्रतीतहोते। भाषा वाड्मयाचा अभ्यास करणारे हे सांगतात की भाषा हि प्रांता गणिक बदलणारी आहे शिवाय प्रत्येकाची मातृभाषा ही वेग्वेगळ्या जातीची लहेज्यांची असू शकते। भाषा हि एक लवचिक व तरल असे

स्वरूपाचे मध्यम आहे। अश्वघोष हे पुरुषपूर (पेशावर) येथील असल्याचे सिध्द झाले आहेण्व भासांच्या जीवनात व त्यांचा लेखणीत अवंती एमगध साम्राज्यातील भागाचा उल्लेख मिळतो। दोन्ही प्रांतात फरक आहेए त्यामुळे भाषांचा फरक असणे निश्चित आहेच।

शिवाय भासानी-पाणिनी च्या व्याकरणावर असलेली नियमावली यावर जास्त अवलंबून न राहता सहज सोप्या भाषेचा वापर केलेला दिसतो त्यामुळे काही विचारवंत म्हणतात की, त्यांनी अ-पाणिनी भाषेचा वापर केला। म्हणून, भास हे पाणिनीच्या कालखंडातले असावे किंवा त्यापूर्वी हे आपण पुढे सिध्द करूपण प्रथमदर्शी ते तर। इसवी सनाच्या पूर्वीचेच आढळतात। कारण पाणिनी हे डॉ. वासुदेव शरण अग्रवाल यांच्या 'पाणिनी कालीन भारत' ग्रंथातील व संशोधनात तसेच विकीपिडियावर ते ईसा पूर्व 400 चे असल्याचे दिसून येतात।

ब) प्रा.कीथ हे हि म्हणणे आहे कि प्रतिज्ञायोगान्धारायण वर बुध्द-चरीताची छाया दिसते, परंतु याच्या उलटे पण होवू शकते कारण भास हा प्रतिथयश नाटककार होता। त्याचा प्रभाव जसा शुद्रकावर, कालीदासावर, राजशेखर या सारख्या नाटककारावर होता तर अश्वघोषावर का नाही। कारण आपण आताच पाहिलेला श्लोक व अश्वघोषाने केलेले अनुकरण त्याचे उत्तम उदाहरण आहे।

क) प्रा.कीथ यांचे म्हणणे आहे की भासांची भाषा शैली हि कालिदासांच्या निकटवर्ती आहे, हि शक्यता नाकारता येत नाहीण्कारण भासांचा उल्लेख केलेल्या प्रांत अवन्ति (उज्जैयिनि) मगध, कुरु, व कालीदासानी उल्लेख केलेले प्रांत वर्णन जवळपास एकच आहेण्त्यात थोडा बहुत बदल असला तरी प्रांत एकाच आहे म्हणून भाषेची शैली निकटवर्ती राहणे हे साहजिकच थोड्या बहुत बदलाने राहणे मान्य राहीलण्यामुळे त्यांचा कालखंडात बदल नाही। असे ग्राह्य धरणे चुकीचे आहे।

**2) खंडन**

काही विचारवंत हे भासाना ईसा 100 व्या शतकात मानतात भासानी आपल्या नाटकात वर्णन केलेल्या नगर रचना पध्दती तसेच पटना जवळील मगध साम्राजाचे राजगृह 'राजगिर' हे राजधानी असल्याचे वर्णन तसेच बौध्द कालीन जागेचा उल्लेख व त्याची जीवनतता हे शिवाय अवंती चे सम्राट प्रध्योत यांचावर आधारित नाटक वर्णन हे सगळे पुरावे त्यांना ईसा पूर्व असल्याचे सिध्द करण्यास उपयुक्त ठरतात।

**3) खंडन**

डॉ.बार्नेट यांनी भासाना ईसा 700 या शतकात असल्याचे सांगितले आहेण्कारण मत्तविलास मधील भाषा हि भासांच्या नाटकाचा भाषेशी मिळती-जुळती आहे भाषा मिळती जुळती राहिली म्हणजेच कालखंड मिलता जुळता राहीलच असे मांडणे हे सबळ मानण्यात येऊ शकत नाही। कारण कालखंड ठरवताना त्यामध्ये सामाजिक आर्थिक, भौगोलिक तसेच तत्कालीन असलेले संदर्भ तसेच तत्कालीन विचारवंत त्यांचे मत इत्यादी बाबी जाणून घेणे महत्वाचे ठरते तसेही त्यांना इतक्या लांब ओढणे शक्य नाही, कारण ईसा 700 च्या आधीच्या कालिदास (ईसा पूर्व 200 ते ईसा 200 च्या मध्ये) साहित्यकार दंडी (ईसा 500), अभिनवगुप्त (ईसा 100), बाणभट्ट (ईसा 700) ह्या सगळ्या प्रतिथ यश नाट्य तज्ञांनी व भासांच्या विषयी व यांच्या नाटकाविषयी गौरव उद्गार काढले आहे।

**4) खंडन**

डॉ.बनर्जी यांनी भासांचा कालखंड हा ईसा पूर्व 200 ठेवला आहे, भासानी वात्सयनाच्या कामशास्त्राच्या उल्लेख केला नाही। जर भासानी कामशास्त्राचा उल्लेख केला नाही तर आपणास असे म्हणावे लागेल कि, ते त्यांच्याही प्राचीन होते। वात्सायन ईसा पूर्व इतकेच प्राचीन होते। भास हे त्यांचाही प्राचीन असावे।

तसेच ते पाणिनी एकात्यायन, व पतंजली यांना पण भासांच्या नंतर चे मानतातण्जर हे सत्य हि असले तरी भासांचा कालखंड ईसा पूर्व 200 असल्याचे सिध्द होत नाही, कदाचित ते त्यांचा पूर्वी चे असू शकतात।

तसेच बनर्जी पुढे मांडतात कि, मनू यांचा कार्यकाळ हा ईसा 200 आहे, असे मानतात व मनू चा उल्लेख भासांनी केलेला नाहीण्व मनुस्मृती या ग्रंथाच्या ऐवजी भासानी मानव धर्म शास्त्र याचा उल्लेख भासांच्या नाटकात आढळतोण्हे मानव धर्मशास्त्र हे मनुस्मृती च्या पहिले आढळतो, परंतु अलीकडे प्रा.बुलर यांचा (secrete books of east series, part-25) या ग्रंथात तसेच विचारवंत पांडुरंग वामन काणे यांचा (History of Dharmshastra) या ग्रंथातील मनू या अध्यायातून आचार्य मनू हे व त्यांची मनुस्मृती हि ईसा पूर्व 400 ते 300 च्या जवळपासची आहे।

मग असे असताना ते ईसा पूर्व 200 चे कसे असू शकतात, म्हणजेच भास हे त्याही पूर्वीचे असू शकतात असा संकेत आपो आपच भेटतो।

5) प्रो.ए.एस.पी. अय्यर ह्यांनी भासाला मौर्यकालीन कालखंडातले मानले आहे, जर भास मौर्यकालीन कालखंडातले असते तर सहज एक बाब इतिहासाच्या माध्यमातून लक्षात घेण्यासारखी आहे ती म्हणजे चाणक्याने आपला अनुभव वापरून चंद्रगुप्त मौर्य यंाना यांना सत्ता मिळवून दिलीही सत्ता काबीज केल्या नंतर तत्कालीन गोष्टीचा सामाजिक आभ्यास केल्यावर काही बाबी लक्षात येतात किए चंद्रगुप्त मौर्य हा ईसा पूर्व 320 मध्ये नंदवंशाचा पाडाव करून गादीवर आला, तेंव्हा बुध्द धर्माचा प्रसार वेगाने चालूच होता। विशेष म्हणजे चंद्रगुप्त मौर्य याने आपले राज्य बंगालच्या खाडी पासून तर अरबी समुद्रापर्यंत विस्तारलेले होते हे इतिहासित आजही नमूद आहेण्त्या शिवाय त्याची राजधानी हि पाटलीपुत्र होती हेही सिद्व झालेले आहे।

जर भास हा मौर्यकालीन होता तर मग त्याने राजधानी हि राजगृह का दाखविली आणि पाटलीपुत्र हि साधारण नगरी म्हणून दाखवली। पाटलीपुत्र ला कुठेतरी नाट्य चक्रामध्ये राजधानी म्हणून उल्लेख आला असताच यात वाद नाही। कारण नाटककार नेहमी आपल्या नाटकातून तत्कालीन समाजाच प्रतिनिधित्व करत असतो।

शिवाय भासानी आपल्या नाटकाच्या भरतवाक्यात त्याने हिमालया पासून तर समुद्रा पर्यंत एकछत्री अमल असावा अशी सदिच्छा व्यक्त केली आहे मौर्याने आपली सत्ता हि आजच्या भारताच्या नकाशापेक्षाही मोठा भाग त्याने व्याप्त केला होताए प्रचंड मोठ्या साम्राजाचा तो मालक होता। मग भासानी अशी अपेक्षा का केली असावी। याचाच अर्थ असा कि तो त्यांचा साम्राज्यात अर्थात मौर्य कालखंडात होता हे आपोआपच सिद्व होण्यासारखे आहे।

6) प्रा.देवधर हे भासाना प्राचिन मनात नाहीत त्यांच्या ‘Plays Describe To Bhasa’ मध्ये त्यांनी भासाला ईस्वी 700 मध्ये नेऊन ठेवलेले दिसते।

आपण या अगोदर हि या बाबतीत विस्तृत चर्चा केलेली आहे, जर भासाच्या नाटकाचा अंतर्गत व बाहय पक्षाचा आधार घेतला तर कोणीही सांगू

शकेल कि भासहा ईस्वी 700 मधला नाहीच किंबहुना तो तर इण्सनाचा पूर्वीचा आहे।

काही इतिहासातील पुरावे

अ) भारतिय इतिहासात 16 जनपद ही फार प्राचीन काळापासून अमलात होती। ईसा पूर्व 600 च्या सुमारास हि त्यांचा प्रभाव होताण्हया सोळा जनपदा मध्ये अंग मगध, काशी, वृज्जी, कौशल, मल्ल, चेदी, वत्स, कुरु, पांचाल, मत्स्य, शूरसेन, अश्मक, अवंती, काम्बोज, गंधार, ह्या होत्या। अवंती ची राजधानी हि उत्तर मध्ये उज्जयिनी व दक्षिणकडे महिष्मती होती।

आ) महाभारताच्या नंतर 27 व्या पिढीमध्ये भगवान बुध्द यांचा समकालीन कौशंबी चा सम्राट हा राजा उदयन होता हे इतिहासात नमूद केलेलं आहे।

इ) पुनिक नामक सेनापती ने यदुवंशाच्या नाश करून त्याच्या मुलगा 'प्रद्योत' याला अवंती या महाजन पदाचा राजा म्हणून गादीवर बसवले व त्याच्या वंशज नंद्वर्धन ह्याचा पाडाव शिशुनाग यांनी केला।

ई) राजा उदयन ह्याने मगध साम्राज्यातील राजा दर्शक ह्याची बहिण पाद्मावती व राजा दृढवर्मा यांची कन्या वासवदत्ता ह्यांचाशी विवाह केल्याचे स्पष्ट संकेत मिळतात, ईसा पूर्व प्रथम शतकामधील शुंगकाळात दबलेल्या खंडार्यात वासवदत्ता हीचे हत्तीवरून पळून जाण्याचे कोरीव.चित्र काशी हिंदू विद्यापीठात आजही उपलब्ध आहे। तसेच अनेक बौद्ध प्राचीन ग्रंथा मध्ये उद्यनाचा उल्लेख मिळतो।

**मंडण**

जर इतके सगळे इतिहासातील पुरावे आपणहाताळले व त्यांची जुळवणूक केली तर काही बाब लक्षात घेतली जाऊ शकते :

1) सम्राट बिम्बिसार ईसा पूर्व 684 ह्यांचा मुलगा अजातशत्रू ह्याने भगवान बुद्धाच्या मृत्यू नंतर 7 वर्षानंतर आपली राजधानी राजगृह आजचे राजगिर वरून पाटलीपुत्र (पटना) येथे हलविली होती।

तसेच मौर्य कालखंडात म्हणजेच ईसा पूर्व 324 ला चन्द्रगुप्त याने पाटलीपुत्र (पटना) याला राजधानी म्हणून घोषित केले

भासांच्या नाटकात बुध्दकालीन वस्तूंचा व भिक्षु तसेच जैन धर्माचा उल्लेख मिळतो। भासांच्या चारुदत्त नाटकाच्या तृतीय अंकात बौध्द भिख्खू ह्यांचा मनातील स्त्री विषयक कामना व्यक्त केली आहे विदूषकाच्या माध्यमातून त्याचा संवादात ते स्पष्ट होताना दिसते।

ह्याच नाटकात संवाहक जुआ हरल्यामुळे, पाठलाग करत असलेल्या लोकांकडून लपत वसंतसेनेकडे आश्रय घेतो व त्याला जीवनाची निर्थकता समजल्याने तो बौध्द संन्यासी होण्याचा निर्णय घेताना ह्याच नाटकात आपणास दिसते तसेच तिसरी महत्वाची घटना म्हणजे ह्याच नाटकाच्या दुसऱ्या अंकात भद्रपोतक नावाचा उमत्त हत्ती एका गैरिक वस्त्र धारी बौध्द भिख्खू वर आक्रमण करतो, त्याची रक्षा वसंतसेनेचा सेवक अर्थात चेट करतो असे दाखवले आहे।

भासांनी बौध्दभिख्खू ह्यांचा तेवढासा आदर केलेला दिसत नाही, ह्यावरून त्याकाळी बौध्द धर्माचा प्रचार-प्रसारास सुरुवात झाली होती हे स्पष्ट होते। तसेही भासांचा कालखंड ठरवताना तो बौध्द कालखंडाच्या दरम्यान किंवा त्यानंतर च्या कालखंडात ठेवल्या जाऊ शकतो।

भास ह्याने केलेल्या राजगिर अर्थात राजगृह चे वर्णन त्यांना मौर्य राजवटीच्या थोड्या पहिले अर्थात ईसा पूर्व 300 च्या अगोदर होऊन गेला असल्याचे सिद्ध करते।

शब्द–ब्रह्म
E ISSN 2320 – 0871
भारतीय भाषाओं की अंतर्राष्ट्रीय मासिक शोध पत्रिका
17 जून 2021
पीअर रीव्यूड रेफ्रीड रिसर्च जर्नल

2) भगवान बुद्धाच्या समकालीन म्हणून राजा प्रद्योत हा उज्जयिनी मध्ये होता हे इतिहासायिक सत्य आहे। भासानी त्यांचा जीवनावर आधारित कथेवर नाटक लिहिले आहेण्म्हणजेच जे उदयन कथेवर आहे। यावरून आपण एक सहज अनुमान लावू शकतो किए एक तर भास हा त्यांच्या समकालीन असला पाहिजे किंवा तो त्यांचा काही काल समोर असला पाहिजे, कारण भास हा राजा प्रद्योत, किंवा उद्यन राजा यांचा पहिले होऊन जाणे शक्यच नाही आणी तसेही बुद्धांचा जन्म हा ईसा पूर्व 563 मध्ये झाला तसेच त्यांचे महापरीनिर्वाण हे ईसा पूर्व 480 च्या जवळ पास झाले। हा कालखंड हा ईसा पूर्व 500 ते 400 च्या जवळ पासच्या होता त्यामुळे उदयनव राजा प्रद्योत हे सुध्दा त्याच काळातले म्हणून भासांच्या कालखंड हा त्यांच्या मागे न ओढता तो सरळ रीतीने मौर्य राजवंशाच्या पहिले व बौद्ध कालखंडाच्या जवळपास अर्थात ईसा पूर्व 400 च्या दशकातला होता हे मान्य करावे लागेल।

3) प्रतिमा नाटकात पाचव्या अंकात रावण हे रामाला त्याने अध्ययन केलेल्या शास्त्राविषयी माहिती देताना दिसतो ज्यामध्ये सांगोपांगवेद मानवीय धर्मशास्त्र महेश्वर योगशास्त्र, बृहस्पती ह्यांचे अर्थशास्त्र अश्या शास्त्रांचा उल्लेख मिळतो। सांगोपांग वेद अंतर्गत येणाऱ्या शाखा-उपशाखा ह्याचे अध्ययन रावणाने केले असे नमूद आहे डॉ. नेमिचंद्र शास्त्री ह्यांचा मते वेदांनी हि परंपरा ईसा पूर्व 800 ते 700 च्या शतका पर्यंत होती ह्या परंपरेचे व शास्त्राचे वर्चस्व हे ईसा पूर्व 400 च्या शतकात लुप्त झाली आज त्याचे अवशेष सुध्दा शिल्लक नाहीत युअ मुळे भास ह्या शास्त्राला जाणत असल्याचे आपोआपच लक्षात येईल म्हणून भासांचा कालखंड हा ईसा पूर्व 400 च्या दरम्यान असण्याची शक्यता नाकारता येत नाही।

रावनाव्दारे वरील श्लोकात मानवीय धर्मशास्त्र ह्या शास्त्राचा उल्लेख मिळतो व त्याची त्यांनी चर्चा केलेली आहे। मानवीय धर्मशास्त्र हे मनुस्मृतीचे पूर्वरूप आहे तसेच मनुस्मृती चे मूळ उद्‌गम स्रोत सुध्दा त्याला मानल्या जाते। मनुस्मृतीचे संकलन हे द्‌वितीय शतकात झाले असे मानतात। मनुस्मृती अनुसार शिक्षक ह्यापेक्षा गुरु मोठा, गुरु समान माता-पिता याचे अस्थान असते। माता-पिता यांना सहस्रगुणांचा गौरव त्यांनी दिला आहे। परंतु भासाने पित्याचा विरुद्ध जाणाऱ्या मात्याला कु-माता असे म्हंटले आहे। हे आपणास प्रतिमा नाटकात पहावयास मिळते।

मध्यम व्यायोग या नाटकात घटोत्कच हा मातेचा आदेशहा सर्वोपरी मानतो शिवाय कर्णभार मधला कर्ण यांनी मातेच महत्व स्वीकार केलेलं आहेण्यावरून एक निष्कर्ष लक्षात येते किए भासानी मनुस्मृतीचा आधार घेतलेला नाही। उलट मनुस्मृती पूर्व जे मानवीय धर्मशास्त्र उपलब्ध होते त्यातील तथ्यांचा प्रभाव त्यांच्या नाटकात दिसतो। त्यामुळे भासांचा कालखंड हा माणू पूर्वी व मानवीय धर्मशास्त्राच्या कालखंडा जवळचा मानवा लागेलण्ह्यावरून मॅक्समुलर यांनी मनुस्मृतीचा कालखंड हा ईसा पूर्व 300 मानला आहे यावरून आपणास सहज अनुमान लावता येते कि, मनुस्मृतीचा कालखंडा अगोदर भासांचा कालखंड होता। म्हणून भासाना ईसा पूर्व 300 च्या नंतर मानने हे तेवढे तार्किक ठरवता येणार नाही। म्हणून भासांच्या कालखंड हा ईसा पूर्व 400 च्या दशकातला असावा असे वाटते।

बृहस्पती अर्थशास्त्र ह्याचा सुध्दा उल्लेख आपणास मिळतो, हा ग्रंथ एक राजनैतिक

शब्द–ब्रह्म
E ISSN 2320 – 0871
भारतीय भाषाओं की अंतर्राष्ट्रीय मासिक शोध पत्रिका 17 जून 2021
पीअर रीव्यूड रेफ्रीड रिसर्च जर्नल

स्वरूपाचा ग्रंथ राहिला असावा, असे काहीना वाटते कारण प्राचीन काळात कौटिल्याचा अर्थशास्त्र ह्या ग्रंथात त्याची प्रसिद्धी राहिली असावी।

डॉ.थामस ह्यांनी 'पंजाब ओरिएन्तल सिरीज' इथे अध्ययन करून व संपादन करून त्याचे काही अंश प्रकाशित केले व प्रकाशित केलेल्या ह्या पुस्तकाचे कौटिल्याचा अर्थशास्त्र ह्या ग्रंथाशी तुलना केली, तेव्हा हे दोन्ही ग्रंथ भिन्न असल्याचे त्यांना निर्देशनास आले। तसेच कौटिल्यानि अर्थशास्त्रात प्रत्येक विषयाला विस्तृत रचले व त्याचे उदाहरण देऊन काही बाबी स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला, या उलट बृहस्पती ह्यांनी तेवढ्या विस्तृत स्वरुपात विषयाची मांडणी केलेली दिसत नाही असे त्यांना आढळलेए म्हणून कौटिल्याचा अर्थशास्त्र हे चांगल्या प्रतीचा ग्रंथ आहे बृहस्पतीच्या ग्रंथच तुलनेत असे त्यांनी आपले मत मांडले।

ह्यावरून भासांना कौटिल्याचा अर्थशास्त्रीयग्रंथाची माहिती उपलब्ध नव्हती, म्हणजेच त्यापूर्वीच्या बृहस्पती ह्यांचा अर्थशास्त्राचीच त्यांना माहिती होती असे दिसते म्हणून भास हे कौटिल्याचा पूर्वी होऊन गेले असे सिध्द होते। अजून एक उदाहरण म्हणजे कौटिल्यानी त्याच्या अर्थशास्त्र ह्या ग्रंथात भासांच्या प्रतिज्ञायोगंधारायण ह्या नाटकातील एक श्लोक त्यांचा ग्रंथात नमूद केलेला आढळतो, तो खालील प्रमाणे

नवं शरावं सलिलैरू सम्पूर्ण सुसंस्कृतं दर्भकृतोत्तरीयम् ।

तत्तस्थ मा भून्नरकं स गच्छेद् थो भूर्तपिण्डस्य कृते न युद्धेत् ।।

हाच श्लोक अर्थशास्त्राच्या अध्याय तीन मध्ये आहे। ह्यावरून इकच बाब लक्षात येते कीए भासह्यांना कौटिल्या विषयी महिती नव्हतीए परंतु कौटिल्य ह्यांना भासांच्या ग्रंथाविषय माहिती होती। यावरून भास हे कौटिल्यपुर्ववती होते हे आपोआपच सिध्द करता येणे शक्य वाटते। कौटिल्य चा काळ हा ईसा पूर्व 700 असा आहे।

रावण द्वारा उल्लेखित याच श्लोकात 'महेश्वर योगशास्त्र' शिवाने सांगितलेली योग विद्या ह्याचा अभ्यास स्वतः शिवशंकर यांनी केला होता प्रा. भांडारकर यांनी सिद्ध केले कि, लकुलीश संप्रदाय यांचे अस्तित्व इ.स ह्याचा कित्येक वर्ष अगोदर होते महेश्वर हे लाकुलीश यांचे अवतार होते व ते योगप्रवर्तक सुध्दा होते या प्रमाणे महेश्वर योगशास्त्र हे ईसा पूर्व 600 ह्या शतकात उपलब्ध होते असे दिसते।

महाभाष्याकार व योगशास्त्रकार महर्षी पतंजली यांचा कार्यकाळ हा ईसा पूर्व 200 होता असे सर्व मानतात। जर भासाना पतंजली चे योगशास्त्र यांची माहिती असते तर त्यांनी महेश्वर योगशास्त्र ह्याचा उल्लेख करण्या ऐवजी सुधारित व प्रसिध्द अश्या पतंजलीच्या योगशास्त्र ह्या विषयी नक्कीच उल्लेख केलेला असता ह्यात शंकाच नाही। म्हणून भास हे पातान्जालीचा पुर्ववती होऊन गेले असे मानण्यास हरकत नाहीएह्यावरून भास ह्यांचा कालखंड निश्चित पणे ईसा पूर्व 500 ते 400 च्या जवळपास झाला असे वाटते।

4) प्रा.काणे यांचे पुस्तक 'History of Dharmshatra' यांचा संदर्भ घेवून एम.एम. हरिप्रसाद शास्त्री यांनी 'प्रतिमा' नाटकातील मंदिराच्या भोवती वाळू टाकण्याचे संकेत भासानी दिलेले आहे असेच संकेत उत्तर भारतात ईसा पूर्व 500 सालात अमलात होते असे, ते मांडतात। म्हणून भास हे त्या कालखंडाच्या आसपास असायला हवे म्हणून त्यांची कालगणना हि ईसा

E ISSN 2320 – 0871
17 जून 2021

पूर्व 400 ते 500 च्या दरम्यानची असावी असे दिसते।

5) भासानी 'आर्य.पुत्र' हा शब्द राजकुमार ह्या नावासाठी वापरला आहे, जो प्रतिमा नाटकात आपणास दिसतो सम्राट अशोकाने धर्म प्रचारासाठी अनेक स्तंभ, शिलालेख कोरले सिद्धपूर येथील एका शिलालेखात 'आर्यपुत्र' म्हणून राजकुमारासाठी नामोल्लेख केलेला मिळतो, त्यामुळे हि परंपरा अनेक वर्ष पासूनची आहे हे सिध्द होते म्हणून भास हे आपोआपच सम्राट अशोकाच्या अगोदर होऊन गेले असे सिध्द होण्यास मदत होते, तेंव्हाच हि परंपरा सम्राट अशोकाच्या शिलालेखात मिळते।

वरील सगळ्या तथ्याचे विश्लेषण करून आपणास म्हणता येईल कि भास हा मनू, पतंजली, कौटिल्य ह्या ऋषी चा पहिले होऊन गेला त्या मुळेते सहजच ईसा पूर्व काळात जातात, तसेच वरील अध्ययनावरून भास हे ईसा पूर्व 500 ते 400 च्या काळातील असल्याचे स्पष्ट होते।

## आद्य नाटककार भास की अश्वघोष

वरील विवेचनावरून आपणास सहज स्पष्ट करता येईल कि भासांचा कालखंड हा ईसा पूर्व होता आणि भदंत अश्वघोष यांचा कालखंड हा इ.स. 100 मधील होता। शिवाय बुद्धचरित नाटकामधील श्लोक, जो प्रतिज्ञा योगांधारायण मधून घेतलेला आहे, या पुराव्यावरून भास हे भदंत अश्वघोष यांचा पूर्वी चे असल्याचे सिध्द होते।

## संदर्भ ग्रंथ

*1 सौंदरनंद- पुष्पिका*

*2 बुद्धचरित पा.क्र- 65*

*3 भास के नाटक (भाग-3) पा. -32*

*4 बुध्दचरित, हरिकृष्ण तेलंग, परमेश्वरी प्रकाशन दिल्ली, 2018*

*5 महाकवि अश्वघोष, हरिदत्तशास्त्री, साहित्य निकेतन, कानपूर .1963*

*6 Ancient India - Solah Mahajanpadas - Encyclopedia*

*7 मध्यप्रदेश का इतिहास स्व.हीरालाल काशीनागरी प्रचारिणी सभा काशी, प्रथम आवृत्ती 1996*

*8 भास के नाटक, भाग.1, 2, 3, चंद्रशेखर उपाध्याय, नाग पब्लीकेशर्स दिल्ली 2001*

*9 महाकवी भास, डॉ.नेमिचंद्र जैन, मध्यप्रदेश हिंदी ग्रंथ अकादमी, द्वितीय संस्करण 2009*